जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ 45 /२०२४
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 29/01/24

## दक्षता विभागाचे परिपत्रक -९

विषय- तांत्रिक निविदांची छाननी करताना निविदाकारांचे पत्ते तपासण्याबाबत.

एका उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्ती कामासाठी सदर प्राप्त निविदांमध्ये दोन वेगवेगळया निविदाकारांचा पत्ता एकच असल्याबाबत या कार्यालयास तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारीच्या अनुषंगाने विधी सल्लागार / प्राधिकरण यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले होते.

त्या अनुषंगाने विधी सल्लागार / प्राधिकरण यांनी त्यांचा अभिप्राय या कार्यालयास सादर केलेला आहे. त्यानुसार, प्रत्येक निविदाकाराचा पत्ता हा वेगळा असणे आवश्यक आहे.

म्हणून सदर परिपत्रकान्वये असे सूचित करण्यात येते की, तांत्रिक निविदा उघडल्यानंतर निविदाकारांचे पत्ते तपासण्यात यावेत. जर दोन निविदाकरांचा पत्ता एकच असेल तर दोन्ही निविदाकारांना तांत्रिक निविदेमध्ये अपात्र करण्यात यावे व उर्वरित निविदांमधील प्रक्रिया सुरु ठेवावी.

सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.